साडेतीन लाखांहून अधिक लोकांना सामावून घेणाऱ्या धारावीने महाराष्ट्रातील मुंबईमधील (बॉम्बे) मध्यवर्ती जागा व्यापली आहे. वस्तीतील बऱ्याच जणांची ही दुसरी पिढी आहे, त्यांचे आईवडील अनेक दशकांपूर्वी येथे आले आणि तेव्हापासून येथेच राहिले. एकेकाळी मासेमारी चालत असलेल्या या गावाशी आजच्या धारावीचे काहीही साम्य नाही. शहरात वसलेले हे शहर म्हणजे एक भरभराटीला आलेली, गजबजणारी वस्ती आहे जी अत्यंत तुटपुंज्या सुविधांमध्ये जगत आहे.

धारावीमध्ये असंख्य, छोटे छोटे, यशस्वी उद्योगही आहेत, त्यामध्ये भरतकाम केलेले तयार कपडे, निर्यात करण्याच्या दर्जाच्या चामड्याच्या वस्तू, मातीच्या वस्तू आणि प्लॅस्टिकच्या वस्तू आहेत. यातील बऱ्याच वस्तू, या वस्तीभर पसरलेल्या छोट्या छोट्या जागांमध्ये तयार होतात आणि स्थानिक बाजारपेठेपासून ते आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपर्यंत सर्वत्र विकल्या जातात. येथील उद्योगांची वार्षिक उलाढाल अंदाजे १५०० ते २००० कोटी किंवा निदान दिवसाला ५ कोटी एवढी आहे.

मुंबईच्या बदलत्या आर्थिक नकाशाने धारावीसाठी नवीन संधी निर्माण केल्या आहेत, त्यांतून अपेक्षा, संधी आणि कमकुवतपणाही आला आहे. या परस्परविरोधी दडपणांतून धारावीच्या नागरिकांसाठी खरोखरीच काही कल्याणकारी निर्मिती होण्यासाठी धारावीचा पुनर्शोध कसा घेता येईल?

# धारावीचा पुनर्शोध

— युडीआरआय



# घेताना

मे २०१४ मध्ये युडीआरआयने धारावीचा पुनर्शोध घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एक कल्पना स्पर्धा घेतली. 'पुनर्शोध' हा शब्द, टिकवून ठेवणे, बदलणे, बदलून टाकणे, पुन्हा जोडणे, पुनर्बांधणी करणे, आणि जिवंत परिस्थितीचा पुनर्विकास करणे या साऱ्यांसाठी वापरला होता. परवडणारी घरे, अर्थार्जन, आरोग्य आणि सार्वजनिक आरोग्य, करमणूक, शिक्षण, नगररचना आणि नागरी योजना, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम, पर्यावरण, शासनव्यवहार, अर्थकारण यांसकट अन्य सर्व नागरी समस्यांकडे पाहण्याच्या नवीन कल्पना, नवीन दृष्टिकोन आणि मध्यस्थीचे नवीन मार्ग निर्माण करून कायमस्वरूपी उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने ही स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेची निष्पत्ती वेगवेगळ्या कालावधीत पार पाडावयाची अनेक धोरणे सुचविते आणि व्यक्त करते - छोट्यापासून मोठ्यापर्यंतच्या कालावधीत पार पाडावयाची, बदलती तसेच कायम स्वरूपी आणि विकास चक्रातील वेगवेगळ्या टप्प्यांवर गाठावयाची.

अंतिमतः स्पर्धेचे उद्दिष्ट होते धारावी संदर्भातील गंभीर समस्यांवर चर्चा चालू ठेवण्याचे आणि स्पर्धेतून आलेल्या कल्पना संबंधित अधिकारी, संस्था आणि लोकांपर्यंत पोहोचविण्याचे.

स्पर्धेचे व्यवस्थापन एका दिशादर्शी समितीने केले (यामध्ये होते, प्रो. अख्तर चौहान, डी. टी. जोसेफ, डेव्हिड कार्डोझ), त्यांना मदत करणारी एक तांत्रिक समिती होती (यामध्ये होते, डॉ. राकेश कुमार, शिरीष पटेल, पंकज जोशी), आणि युडीआरआयने संस्थात्मक आधार दिला.

या स्पर्धेमधून विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे संघ एकत्र येतील असे पाहिले गेले, जसे, स्थापत्यशास्त्र, अर्थकारण, अभियंताशास्त्र, पर्यावरण, आरोग्य आणि शिक्षण, भूप्रदेश, कायदा, सामाजिक विज्ञान, वाहतूक, नगररचना, नागरी शासनव्यवहार आणि नागरी नियोजन.

शासनव्यवहार, अर्थव्यवस्था, हितसंबंधीयांची कर्तव्ये, वाहतूक, समाजिक संरचना, भोगोलिक संरचना, गर्दीचे विश्लेषण आणि धोरणे असे अनेक विषय सामावण्यासाठी स्पर्धेची बांधणी केली गेली.

स्पर्धेच्या सुरुवातीलाच, जूनच्या पहिल्या आठवड्यात, धारावी पुनर्शोध संघाने सहभागी स्पर्धकांसाठी धारावीमध्ये एक क्षेत्र फेरी आणि एक कार्यशाळा घेतली.

नॅशनल स्लम ड्वेलर्स फेडरेशनचे (एनएसडीएफ) अध्यक्ष, जोकिन अर्पुथम आणि भारतभरच्या झोपडपट्ट्यांसाठी महिला बचतीचे काम करणारी महिला मिलन ही संस्था यांच्या मदतीने एक दोन दिवसांची क्षेत्र भेट आयोजित केली गेली.

अनेकविध विषयांच्या अभ्यासातून वेध घेणाऱ्या आणि स्वीकारार्ह अशा पद्धतीतून सहभागींना धारावी समजून घेता यावी अशा रीतीने पाच दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यासाठी सहभागींबरोबर चर्चा करण्यासाठी शहरातील विविध विषयांतील नामांकित तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. यामध्ये, प्रो. अख्तर चौहान, माधव पै, जोकिन अर्पुथम, डॉ. अर्मिडा फर्नांडिस, शरीत भौमिक, अजित रानडे, मधुश्री दत्ता, कल्पना शर्मा, नीरा आडारकर, दत्त इस्वालकर, डेव्हिड कार्डोझ, शिरीष पटेल, डॉ. शालिनी टंडन आणि अनिरूद्ध पॉल हे होते.

ऑक्टोबरमध्ये स्पर्धेसाठी २१ देशांतील १४९ सहभागींच्या २० संघांकडून प्रवेशपत्रिका आल्या. त्यावर निर्णय घेणाऱ्या परिक्षकांमध्ये डी. एम. सुखटणकर (अध्यक्ष). अभय पेठे, अमिता भिडे, अनु आगा, सायरस गझदर, जयतीर्थ राव, आणि रोमिला

थापर हे होते. प्रवेशिकांमध्ये कल्पनांचे एक विस्तृत क्षेत्र होते, सर्वसमावेशक दृष्टिकोनापासून ते छोट्या छोट्या मध्यस्थींपर्यंत त्या पसरल्या होत्या. प्रत्येक संघानी धारावीतील समस्यांची उकल करण्यासाठी त्यांच्या विश्लेषणाच्या पायावर आधारीत असलेले अनेक मार्ग दाखवले होते. त्यांच्या काही कल्पनांमध्ये साधर्म्यही होते, जसे लोकसहभागाला संस्थात्मक रूप देणारी शासनव्यवहार संरचना, नैसर्गिक मनोरंजनासाठी सार्वजनिक जागा म्हणून पाणथळ जागांचे पुनर्वसन, वाढत्या गृहरचना आणि संरचना तरतुदी. या स्पर्धेमधून पुढे आलेल्या आणखी काही उद्बोधक गोष्टी म्हणजे धारावीसाठी आकाराधित नियम लिहिणे, धारावी उत्सव आयोजित करणे, वस्तीचे आर्थिक क्षेत्र निर्माण करणे आणि एकात्मिक वाहतूक धोरण ठरविणे.

सहभागी झालेल्या संघांमधून निवडलेल्या सहा प्रवेशिकांचे दर्शन घडविण्यासाठी, डिसेंबर २०१४ मध्ये एक दोन दिवसांची परिषद भरवली गेली.

जिंकलेल्या प्रवेशिकेमध्ये धारावीसाठी एक सामुदायीक जमीन विश्वस्त संस्था निर्माण करण्याची कल्पना मांडली गेली होती, यामध्ये महाराष्ट्र सरकार, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, सेवाभावी संस्था (एनजीओ), तज्ज्ञ, वस्तीतील संस्था, उद्योगाधारित संस्था आणि धारावीचे रहिवाशी होते.

पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये सर्व २० प्रवेशिका पाहण्यासाठी ठेवलेल्या होत्या आणि शहराच्या विविध भागांमध्ये त्यांचे फिरते प्रदर्शन भरविण्यात आले, सोमय्या कॉलेज, स्थापत्यशास्त्राचे रिझवी कॉलेज आणि काळाघोडा कला उत्सव येथे हे प्रदर्शन फिरवण्यात आले.

या स्पर्धेतून आलेल्या महत्त्वाच्या कल्पना आणि तत्सम अन्य उपक्रम युडीआरआय निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींसमोर, नोकरशहांसमोर आणि प्रशासकांसमोर मांडून धारावी सुधारण्यासाठी असलेले विविध मार्ग त्यांना दाखवित आहे.



क्षेत्रभेटीचा पहिला दिवस रविवार होता, १ जून, २०१४. या दिवशी नाईक नगर, धोबी घाट, ट्रान्झिट कॅम्प आणि कुंभारवाडा या स्थळांना भेटी दिल्या.










क्षेत्र भेटीच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी २ जून २०१४. या दिवशी भेट दिलेल्या स्थळांमध्ये, तेरावे कंपाउंड, चामडे बाजार, कोळीवाडा आणि राजीव इंदिरा सूर्योदय को. ऑ. हाऊसिंग सोसायटी यांचा समावेश होता.







